शब्दांना सत्याची धार
प्रहार

# सायबर धोक्यांमुळे भारतीय तरुणांच्या आत्महत्या वाढल्या

## नवीन पथदर्शी प्रकल्प तयार करण्याची गरज

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

ए यु कॉर्पोरेट ॲडवायजरी अँड लीगल सर्विसेज हे आजच्या कायदेशीर सल्ला क्षेत्रातील आघाडीचे नाव असून त्यांनी आज एका मुख्य पथदर्शक उपक्रमासाठी भारतात सायबर गुंडगिरीच्या विळख्यात अडकलेल्या प्रत्येक मौल्यवान जीवाला वाचवण्यासाठी आणि संरक्षण देण्यासाठी सायबर छळ, सायबर गुंडगिरीच्या विरोधात तरुणांचा आवाज उठविणाऱ्या डब्लू एच टी नाऊ सोबत भागीदारीची घोषणा केली आहे.

डिजिटल युगाने तंत्रज्ञानाने लोकांचा संपर्क, संवाद साधण्याच्या आणि माहितीची देवाण-घेवाण



करण्याच्या पद्धतीत क्रांती घडवून आणली आहे. या तांत्रिक भरभराटीने सायबर गुंडगिरी, सायबर गुन्हे आणि सायबर छळ यासारख्या नवीन आव्हाने समोर उभी ठाकली आहेत. ही आव्हाने भारत आणि जगभर महत्त्वपूर्ण सामाजिक समस्या म्हणून वेगाने उभी राहत आहेत. भारतासारख्या देशात या समस्या विशेषतः गंभीर आहेत.

> भारत डिजिटलदृष्ट्या सक्षम समाज बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना, सायबर गुंडगिरी, सायबर गुन्हे आणि सायबर छळामुळे उद्भवणाऱ्या जोखमींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.
>
> - खेतान, एयुचे संस्थापक अध्यक्ष

कारण इंटरनेटचा वापर झपाट्याने वाढलेला आहे. याव्यतिरिक्त, युवा मार्गदर्शक, सायबर गुन्हे पोलीस पथक, कायदेशीर मार्गदर्शन आणि समर्थन, व्यापक जनसंपर्क जागरुकता कार्यक्रम आणि भारतभरातील महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये सामाजिक मोहिमा सुरू करतील.

> आमचे ध्येय एक सुरक्षित आणि सहाय्यक ऑनलाइन युवा समुदाय तयार करणे आहे जिथे ते सायबर गुंडगिरी आणि सायबर छळाच्या भीतीशिवाय संवाद साधू शकतील. सायबर छळाविरुद्ध आउटरीच अवेरनेस प्रोग्रामद्वारे युवा मंच उपलब्ध करून हे साध्य करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.
>
> - नीती गोयल, डब्ल्यूएचटी नाऊ संस्थापिका, मानव कल्याणकर्त्या

याव्यतिरिक्त, समाज संवेदनशील करण्यासाठी चर्चासत्रे, परिषदा, पॅनेल चर्चा, केस स्टडी विश्लेषण, रोड शो, वॉकथॉन, मेणबत्ती मोर्चा, नाटुकली, कला प्रदर्शन, वादविवाद आयोजित केले जातील.